आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१२ जुलै २०२५ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- तरुणांना विकासाचं माध्यम बनवण्यासाठी रोजगार मेळावा हा सरकारच्या वचनबद्धतेचं प्रतिबिंब असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन/ देशभरातल्या ४७ ठिकाणी रोजगार मेळाव्यांमधून ५१ हजाराहून जास्त नियुक्तीपत्रांचं वाटप

- मराठ्यांच्या १२ गड किल्ल्यांना जागतिक वारसास्थळांच्या यादीत स्थान मिळाल्याबद्दल सर्वत्र आनंद

- छत्तीसगडमध्ये सुकमा जिल्ह्यात ९ महिलांसह २३ माओवाद्यांचं आत्मसमर्पण

**आणि**

- विम्बल्डन टेनिस स्पर्धेत आज महिलांचा अंतिम सामना इगा श्वियांतेक आणि अमांडा अनिसिमोव्हा यांच्यात रंगणार

**<><><><>**

विकसित भारतासाठी तरुणांना सक्षम तसंच विकासाचं माध्यम बनवण्यासाठी रोजगार मेळावा हा सरकारच्या वचनबद्धचतेचं प्रतिबिंब असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मो◌ेदी यांनी म्हटलं आहे. देशभरात ४७ ठिकाणी आयोजित १६व्या रोजगार मेळाव्याला त्यांनी आज संबोधित केलं.

**- होल्ड बाईट- PM- -**

यावेळी त्यांनी दूरदृश्यप्रणाली द्वारे विविध सरकारी विभागांत नव्यानं नियुक्त झालेल्या युवकांना ५१ हजारांहून अधिक नियुक्ती पत्रांचं वितरण केलं.

खाजगी क्षेत्रात नवीन रोजगाराच्या संधी निर्माण करण्यावर सरकारचा भर असून सरकारनं रोजगाराशी संबंधित प्रोत्साहन योजना ही एक नवीन योजना मंजूर केली असल्याचं त्यांनी नमूद केलं. उत्पादन क्षेत्राला चालना देण्यासाठी या वर्षीच्या अर्थसंकल्पात मिशन मॅन्युफॅक्चरिंगची घोषणा करण्यात आली असल्याचं मोदी म्हणाले. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या अलिकडेच प्रसिद्ध झालेल्या अहवालाचा देखील त्यांनी उल्लेख केला.

गेल्या दशकात देशभरातल्या ९० कोटींहून अधिक नागरिकांना कल्याणकारी योजनांच्या कक्षेत आणण्यात आलं असल्याचं या अहवालात नमूद केलं आहे.

देशभरात रोजगार मेळाव्यांद्वारे आजवर १० लाखांहून अधिक नियुक्ती पत्रं जारी करण्यात आली आहेत.

नागपूरच्या दक्षिण पूर्व मध्य रेल्वे विभागाच्या वतीनं उत्तर नागपूर इथल्या मंगल मंडप इथं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते विविध विभागांमधून निवडलेल्या एकूण १४९ उमेदवारांना नियुक्ती पत्राचं वाटप करण्यात आलं. शासकीय नोकरी ही चांगली समाजसेवा आणि देश सेवा करण्याची संधी समजून कर्तव्य पार पाडावं आणि यशस्वी व्हावं, असं आवाहन गडकरी यांनी यावेळी नवनियुक्तांना केलं. केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांनी मुंबईतल्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस इथून तर नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पुण्यातून या कार्यक्रमात भाग घेतला.

**<><><><>**

मराठा इतिहासात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या १२ गड किल्ल्यांना युनेस्को- जागतिक वारसास्थळांच्या यादीत स्थान मिळाल्याबद्दल सर्वत्र आनंद व्यक्त होत आहे. यामुळे भारतातल्या जागतिक वारसास्थळांची संख्या आता ४४ झाली आहे. जागतिक वारसास्थळं समितीची ४७वी बैठक पॅरिसमधे काल झाली, त्यात हा निर्णय झाला. यामध्ये रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, खांदेरी तसंच तामिळनाडूतला जिंजी या किल्ल्यांचा समावेश आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या निर्णयाबद्दल आनंद व्यक्त केला आहे. मराठा साम्राज्याची ओळख सुशासन, समाजकल्याण, लष्करी सामर्थ्य आणि सांस्कृतिक अभिमानाशी निगडित असल्याचं प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे. केंद्रीय सांस्कृतिक कार्य मंत्री गजेंद्र सिंग शेखावत यांनी देखील या निर्णयाबद्दल समाधान व्यक्त केलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी या निर्णयाबद्दल आनंद व्यक्त केला आहे.

**<><><><>**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची पाहणी केली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेही यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्र्यांनी विमानतळाच्या

प्रत्यक्ष रन वे पासून टर्मिनल इमारतीपर्यंतच्या प्रगतीची माहिती घेतली. विमानतळाची कामं अधिक वेगात पूर्ण करून ३० सप्टेंबरपर्यंत त्याचं उद्घाटन करण्याचं लक्ष्य अदानी कंपनीला दिलं आहे.   विमानतळाचं ९४ टक्के काम पूर्ण झालं आहे. टर्मिनल इमारतीचं कामही पूर्ण झालं आहे, आता आतल्या भागाचं काम सुरू आहे, अशी माहिती फडणवीस यांनी पत्रकार परिषदेत दिली.

<><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून साकार झालेले उडान यात्री कॅफे लवकरच सुरू करणार असल्याची घोषणा केंद्रीय नागरी हवाई मंत्री के. राममोहन नायडू यांनी केली. देशात विमानसेवा वाढवण्यावर भर असल्याचंही त्यांनी सांगितलं. मुंबईत आयोजित परिषदेत काल ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ हेही यावेळी उपस्थित होते. देशातलं सर्वोत्तम ऑफ शोअर एअरपोर्ट मुंबईत उभारणार असल्याची माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिली.

<><><>

भारतातल्या भाषिक वारशाचा अभ्यास, संशोधन आणि संवर्धनासाठी मुंबई विद्यापीठात ‘सेंटर ऑफ एक्सलेंस इन हेरिटेज लँग्वेजेस अँड मल्टी- कल्चरल स्टडीज’ची स्थापना केली जाणार आहे. हे केंद्र भारत सरकारच्या अल्पसंख्याक विकास मंत्रालयाच्या सहकार्याने स्थापन केले जाणार असून यासाठी अर्थसहाय्य दिले जाणार आहे. या केंद्रात प्रामुख्यानं  ‘अवेस्ता-पहलवी’, ‘पाली’ आणि ‘प्राकृत’ या प्राचीन भाषांवर भर दिला जाणार आहे.

<><><>

छत्तीसगडमध्ये सुकमा जिल्ह्यात ९ महिलांसह २३ माओवाद्यांनी पोलिसांसमोर आज आत्मसमर्पण केलं. या माओवाद्यांवर एकूण १ कोटी १८ लाख रुपयांचं बक्षीस असल्याचं  पोलिसांनी सांगितलं.  राज्य सरकारच्या पुनर्वसन धोरणांतर्गत या माओवाद्यांना प्रोत्साहन म्हणून पन्नास हजार रुपयांचा धनादेश आणि इतर सर्व सुविधा देण्यात येतील.

<><><>

अहमदाबादमध्ये गेल्या महिन्यात झालेल्या एअर इंडिया विमान अपघात प्रकरणी विमान अपघात तपास यंत्रणेनं काल १५ पानांचा प्राथमिक अहवाल प्रकाशित केला आहे.

उड्डाण सुरू झाल्यानंतर काही सेकंदातच विमानाचं इंजिन इंधन नियंत्रण 'RUN' मोड वरून 'CUTOFF' स्थितीत गेलं आणि बंद झालं, परिणामी ही दुर्घटना घडली असं या अहवालात म्हटलं आहे. या अपघातात २६० जणांचा मृत्यू झाला.

**<><><><>**

आषाढी यात्रेनिमित्त यंदा ५ हजार २०० जादा बसगाड्यांच्या माध्यमातून एसटीने साडे एकवीस हजार फेऱ्यांद्वारे तब्बल ९ लाख ७१ हजार ६८३ भाविक - प्रवाशांची सुरक्षित ने-आण केली आणि त्यांना विठ्ठल दर्शन घडवलं आहे. या सेवेतून एसटीला ३५ कोटी ८७ लाख ६१ हजार रुपयांचं उत्पन्न मिळालं असल्याची माहिती परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. महामंडळानं गेल्या वर्षीपेक्षा यंदा ६ कोटी ९६ लाख ३ हजार रुपये जास्त उत्पन्न मिळवलं. चांगलं उत्पन्न आणून लाखो भाविकांना सुखरुप देवदर्शन घडवून आणणारे हजारो चालक, वाहक, यांत्रिकी कर्मचारी, पर्यवेक्षक आणि अधिकाऱ्यांचं मंत्री नाईक यांनी अभिनंदन केलं.

**<><><><>**

विम्बल्डन टेनिस स्पर्धेत आज महिलांचा अंतिम सामना ५ वेळा ग्रँडस्लॅम जिंकणारी पोलंडची इगा श्वियांतेक आणि १३वी मानांकित अमांडा अनिसिमोव्हा यांच्यात रंगणार आहे. भारतीय वेळेनुसार सामना रात्री साडेआठला सुरु होईल.

पुरुषांच्या स्पर्धेत अव्वल मानांकित यानिक सिनरने काल नोव्हाक जोकोविचचा पराभव करुन अंतिम फेरीत धडक मारली. त्याचा सामना उद्या  द्वितीय मानांकित कार्लोस अल्काराझ बरोबर होईल.

**<><><><>**

भारत-इंग्लडदरम्यान अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट स्पर्धेत तिसऱ्या  सामन्यात चुरस निर्माण झाली आहे. लंडनच्या लॉर्ड्स मैदानावर यजमान इंग्लंडविरुद्ध दुसऱ्या दिवशी भारताने ३ बाद १४५ धावा केल्या. इंग्लंडचा संघ पहिल्या डावात ३८७ धावांवर सर्वबाद झाला. जसप्रीत बुमराहने पाच गडी बाद केले आणि विक्रमाची नोंद केली. पाच सामन्यांची कसोटी मालिका सध्या १-१ अशी बरोबरीत आहे.

**<><><><>**

मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमाशुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी दोन वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये विविध वन्यप्राणी जप्त केले आणि दोघांना अटक केली. पहिल्या प्रकरणात गुप्त माहितीच्या आधारे सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी बँकॉक इथून मुंबईला उतरलेल्या एका प्रवाशाची झडती घेतली असता त्याच्याकडे दोन जिवंत आणि एक मृत मिरकॅट, आणि एक ग्रेट बिल्ड पोपट आढळून आले. तर दुसऱ्या प्रकरणात बँकॉक इथून मुंबईला आलेल्या एका प्रवाशाच्या बॅगेत दोन सुमात्रन पट्टेरी ससे, एक मृत ग्रेट बिल्ड पोपट आणि एक इंडोचायनीज बॉक्स कासव असे प्राणी आढळून आले. या दोन्ही प्रवाशांना अटक करण्यात आली आहे.

**//<><><><>//**